| MHKO050001452025 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०२५ मध्ये नि.क्र.२६ खालील आदेश.</u>** **<u>बाबु पारीसा राजमाने व इतर विरुध्द बाबासो गुंडा कांबळे व इतर.</u>** |
|---|---|

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.४ व ८ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत/जबाब (No WS/Say) चा आदेश रद्द (set-aside) करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यावर वादीतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला.

२. युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूम होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. परंतु अनेक संधी देऊन सुध्दा सदर प्रतिवादींनी दाव्यास लेखी कैफियत न दिल्यामुळे त्यांचे विरुध्द विनाकैफियत आदेश पारीत केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची नैसर्गिक न्यायतत्वास अनसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमूद केलेले कारण व कायदेशीर बाब विचारात घेता सदर प्रतिवादींना त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र.४ व ८ यांचा सदर अर्ज **नि.क्र.२६** वादींना एकत्रित रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशे) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.07.04 16:52:27 +0530

**(आर. डी. खराटे)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, इचलकरंजी.

दि.०३/०७/२०२५.